# गझल माझी

मी गझलेचा विषय काढताच, ते लोक गेले दुरुनी
वाटते तयांना माझी हर, गझल म्हणे फक्त विराणी ॥ १ ॥

दाखले ते दिले मला, किती अनेक गझलांचे त्यांनी
परंतु माझी गझल आहे, ना नवी; ना पुराणी ॥ २ ॥

मी ऐकवताच गझल माझी, मुरडली हो नाके त्यांनी
वाह वाह; साद मात्र ,आली अस्सल दाही दिशातुनी ॥ ३ ॥

विचारले मी सहजेच मग, कशी वाटली गझल ऐकुनी
नि:शब्द आसमंत सारा देती, दाद ओले डोळे जुबानी ॥ ४ ॥

तरी आवडली न कुणास, सुरेख आहे म्हणे कोणी
बेफिकीर मी; असा अन, हर गझल माझी दिवाणी ॥ ५ ॥

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78